बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Benchmark Criteria) विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५ /२०१९/दहा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : **१३.०९.२०१९.**

संदर्भ:-

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२,
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१०/प्र.क्र.५६३/२०१०/दहा, दि.०७.०९.२०११,
३) केंद्र शासन कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १४०१५/३०/२०१५-AIS-I, दि. २०.०३.२०१५.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१६/प्र.क्र.५४/२०१६/दहा, दि.०८.०२.२०१६.
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा, दि.०४.०२.२०१७ आणि तद्नुषंगिक समक्रमांकित दि.२३.०२.२०१७ आणि दि.१९.०४.२०१७ ची शुध्दीपत्रके.
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२०.०१.२०१८
७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२८.०२.२०१८ चे शुध्दीपत्रक.
८) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९.
९) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१, दि.१०.०७.२०१९.
१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१, दि.१६.०८.२०१९.

प्रस्तावना-

सन २०१८ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता समक्रमांकित दिनांक १०.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहीत करण्यात आले आहेत. तसेच समक्रमांकित दिनांक १६.०८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन

विभागाकडे विहित निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सादर करण्यास दिनांक २३.०८.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

दरम्यान उपरोक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या निवेदनांचा सर्वंकष विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय: -**

समक्रमांकित दिनांक १०.०७.२०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील

*" प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सदर विभागाअंतर्गतच्या **प्रत्येक सेवेतील** (सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दिनांक ०९.०७.२०१९ अन्वये विहित केलेल्या) उपरोक्त अ.क्र. अ), ब), क) व ड) येथील पात्रता धारण करणाऱ्या, **प्रत्येकी कमाल २० अधिकाऱ्यांच्या** नावांचा प्रस्ताव (संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी इच्छुकतेसह) या विभागास पाठवावा. असा प्रस्ताव पाठविताना ज्या अधिकाऱ्यांच्या १० गोपनीय अभिलेखांपैकी किमान ९ गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट दर्जाचे आहेत असा सेवाज्येष्ठ अधिकारी वगळला जाणार नाही याची संबंधित प्रशासकीय विभागाने दक्षता घ्यावी. तसेच गोपनीय अहवालांची गणना करताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी".*

***याऐवजी***

*" प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सदर विभागांतर्गतच्या प्रत्येक सेवेतील (सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दिनांक ०९.०७.२०१९ अन्वये विहित केलेल्या) - ज्या सेवेत उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष असलेल्या घोषित पदावर (६ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० आणि ७ व्या वेतन आयोगानुसार Pay Matrix S-20: 56100-177500) सरळ सेवेने नियुक्ती करण्यात येते, त्या सेवेतील उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष घोषित पदावर निवडसूचीच्या वर्षाच्या दि.१ जानेवारी म्हणजेच दिनांक ०१.०१.२०१८ रोजी किमान ८ वर्षे सतत सेवा झालेल्या आणि उपरोक्त अ.क्र. अ), ब), क) व ड) येथील पात्रता धारण करणाऱ्या **सर्व अधिकाऱ्यांच्या** नावाचा प्रस्ताव (संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी इच्छुकतेसह) या विभागास पाठवावा.*

*तसेच ज्या सेवेतील (सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दिनांक ०९.०७.२०१९ अन्वये विहित केलेल्या) उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष असलेल्या घोषित पदावर (६ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० आणि ७ व्या वेतन आयोगानुसार Pay Matrix S-२०: ५६१००-१७७५००) सरळ सेवा आणि पदोन्नती या दोन्ही मार्गाने ठराविक प्रमाणात नियुक्ती करण्यात येते, त्या सेवेतील उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष घोषित पदावर निवडसूचीच्या वर्षाच्या दि.१ जानेवारी म्हणजेच दिनांक ०१.०१.२०१८ रोजी किमान ८ वर्षे सतत सेवा झालेल्या आणि उपरोक्त अ.क्र. अ), ब), क) व ड) येथील पात्रता धारण करणाऱ्या **सर्व अधिकाऱ्यांच्या** नावाचा प्रस्ताव या विभागास पाठविताना, आरक्षण आणि सेवाज्येष्ठतेसंदर्भातील सर्व न्यायालयीन प्रकरणातील न्यायनिर्णय / शासन निर्णय / आदेश विचारात घेऊन कोणताही सेवाज्येष्ठ अधिकारी वगळला जाणार नाही याबाबतची खातरजमा संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने करावी.*

*वरीलप्रमाणे प्रस्ताव पाठविताना ज्या अधिकाऱ्यांच्या १० गोपनीय अभिलेखांपैकी किमान ९ गोपनीय अभिलेख अत्युउत्कृष्ट दर्जाचे आहेत असा सेवाज्येष्ठ अधिकारी वगळला जाणार नाही याची संबंधित प्रशासकीय विभागाने दक्षता घ्यावी. तसेच गोपनीय अहवालांची गणना करताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी."*

**असे वाचण्यात यावे.**

२. दिनांक १०.०७.२०१९ च्या शासन निर्णयातील उर्वरीत तरतूदी कायम राहतील.

**३.** उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद सुधारणेनुसार, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सुधारीत प्रस्ताव या विभागास सादर करावेत. भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीकरीता विहीत निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून मागविण्यात यावेत. या निवड प्रक्रीयेकरीता संघ लोकसेवा आयोगाने वेळापत्रक विहित केले असल्याने, त्यानुसार प्रक्रीया वेळेत पार पाडण्याच्या दृष्टीने, **गुरूवार दि.१०/१०/२०१९ पर्यंत साप्रवि, कार्यासन- १०** मध्ये प्राप्त होणारे प्रस्तावच विचारात घेण्यात येतील .

**४.** उपरोक्त पात्रता निकष (Bench Mark Criteria) हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून होण्याऱ्या प्रक्रियेस भावी परिणामाने (With Prospective Effect) लागू होईल.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०९१३१५०७१३२६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.09.13 16:37:36 +05'30'

**(सीताराम कुंटे)**
**अपर मुख्य सचिव (सेवा)**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
८. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
९. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. निवड नस्ती.